दुष्काळाने वाळवंट बनलेली बोर नदी खोदताच दुथडी भरली

परसोडा | परिसरात मागील आठवड्यात झालेल्या पावसामुळे बोरनदी तुडुंब भरली आहे. या पाण्यामुळे परिसरातील विहिरींना पाणी आले आहे. २० फूट रुंदी असलेल्या बोर नदीपात्राची स्वच्छता करण्यासाठी इकोनीड फाउंडेशनने पुढाकार घेतला होता. संस्थेने ग्रामस्थांच्या मदतीने १ जून रोजी नदीपात्रातून पन्नास हजार ब्रास गाळ उपसला. नदीपात्राची रुंदी ८० फूट, तर खोली १५ फुटांपर्यंत वाढवण्यात आली. पात्रातील गाळ शेतकऱ्यांच्या शेतात टाकण्यात आल्याने जमिनीचा कस सुधारण्यास मदत होणार आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर सहा जून रोजी जोरदार पाऊस झाला व नदीपात्र तुडुंब भरले.

एकाच दिवसात पात्रात ४५ लाख लिटर पाणी साचले. यामुळे परिसरातील विहिरींना पाणी आले. तसेच बंद पडलेल्या हातपंपांनाही पाणी आले. शनिवार, १४ रोजी या पाण्याचे पूजन करण्यात आले. या वेळी इकोनीडचे अध्यक्ष प्रा. सदानंद आगळे व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ज्या गावात नदीचे संवर्धन होईल ते गाव संपन्न होईल, असे प्रा. आगळे यांनी सांगितले. येणाऱ्या काळात बोर नदी संवर्धनासाठी आदर्श ठरेल, अशी प्रतिक्रिया सरपंच विशाल जगताप यांनी व्यक्त केली. हा उपक्रम सर्वत्र राबवल्यास पाणी टंचाईवर सहज मात करता येवू शकते, हेच दिसून आले.